# सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक द्वारकादास भांगे यांना राष्ट्रपतींचे पोलीस पदक जाहीर

सन 1991 मध्ये छत्रपती संभाजीनगर शहर पोलीस दलात पोलीस कॉन्स्टेबल म्हणुन भरती झालेले द्वारकादास भांगे यांना तत्कालीन पोलीस आयुक्त श्री. अनामी रॉय यांनी नवीन पोलीस आयुक्तालयातील पोलीस आयुक्तांना असलेले अधिकारांच्या कारवाया करणेकामी गुन्हे शाखा येथे संधी दिली व तेव्हापासुन द्वारकादास भांगे यांनी पोलीस आयुक्तांना असलेल्या विशेष अधिकारांच्या कारवाया केल्या आहेत. शहरात दुर्गंधी पसरविणारे हाडे उकळणारे कारखाने सन 1992 ते 1995 च्या दरम्यान फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम 133 व 138 प्रमाणे बंद करण्याच्या कारवाया केल्या. त्याचप्रमाणे चिकलठाणा एमआयडीसी येथील महाराष्ट्र डिस्टीलरीज मधुन सोडलेल्या रसायनामुळे होणारी दुर्गंधी विचारात घेवुन सदरचा कारखाना देखील बंद करण्यात आलेला होता. तसेच छत्रपती संभाजीनगर शहराभोवती असलेल्या वीटभट्ट्यांमुळे शहरात होणारे प्रदुषण थांबविण्यासाठी सदर वीटभट्ट्या देखील बंद करुन छत्रपती संभाजीनगर प्रदुषण मुक्त करण्यात हातभार लावला.

आशिया खंडात झपाट्याने वाढणारे छत्रपती संभाजीनगर मध्ये गुन्हेगारीही त्याच गतीने वाढत असतांना वेळीच अशा गुन्हेगारांवर एमपीडीए ॲक्ट 1981 अंतर्गत प्रतिबंधक स्थानबद्धता कारवाया व मोक्का अंतर्गत गुन्हे दाखल करुन शहरातील जवळपास चार हजार गुन्हेगारांवर कारवाया करुन शहरातील वाढती गुन्हेगारी नियंत्रणात ठेवण्यात मोलाची कामगिरी केली. त्याचप्रमाणे येथे विशेष नमुद करण्यात येते की, मोक्का या कायद्याचा मसुदा तयार करताना त्यांचे योगदान लाभलेले आहे.

त्यांच्या एकुण 33 वर्षाच्या कालावधीत केवळ छत्रपती संभाजीनगर शहरातीलच नव्हे तर संपुर्ण महाराष्ट्रात पोलीस अधिकारी यांना तपासाशी संबंधित आलेल्या अडचणींना वेळीच कायदेशिर तरतुदी व प्रक्रियाचे मार्गदर्शन करुन अनेक अडचणी सोडविलेल्या आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र पोलीसांशी संबंधित मा. उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालयात दाखल होणाऱ्या खटल्यांमध्ये वेळोवेळी योग्य तो पाठपुरावा करुन शासनाची बाजु लावुन धरलेली आहे.

त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण हे शासकीय ज्ञानविद्यान महाविद्यालय येथे झालेले असल्याने व त्यांच्या शैक्षणीक काळात महाविद्यालयाच्या जागेत वंदे मात्रम हॉलचे उद्घाटन भारताचे तत्कालीन राष्ट्रपती मा. श्री. ग्यानी झैलसिंग यांचे हस्ते झालेले होते व याच मुद्यावर शासन पातळीवर महाराष्ट्र शासनासी पाठपुरावा केल्याने आज ते वास्तवात उतरलेले आहे.

त्यांनी त्यांच्या आजपावेतोच्या कार्यकाळात 1) "Dying Declaration" 2) "Supreme Court on Rape Cases" 3) "Digest on MPDA Act, 1981" अशी तीन पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्यांनी सन 2017 मध्ये राज्यातील शिक्षेचे प्रमाण कसे वाढेल यावर शोधप्रबंध लिहिला व तो राज्यभर राबविण्यासाठी मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून अंमलात आणला आहे.

त्यांनी पोलीस खात्यात आल्यानंतर एलएलबी व एलएलएम असे कायद्याचे उच्च शिक्षण घेतल्याने व त्यांना अभ्यासात रुची असल्याने त्यांनी महाराष्ट्र राज्यातील पोलीस उपनिरीक्षक ते भारतीय पोलीस सेवा मधील पोलीस अधिकारी यांना जवळपास 800 लेक्चर्स महाराष्ट्र पोलीस ॲकॅडमी नाशिक, पोलीस संशोधन केंद्र पुणे, पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा, बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पालघर व तसेच महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हा पोलीस दलास दिलेले आहेत व कायद्यातील तरतुदी विषयी अवगत केलेले आहे.

द्वारकादास भांगे यांच्या एकुण 33 वर्षाच्या सेवाकाळात त्यांनी उत्कृष्ट व वैशिष्ट्यपूर्ण केलेल्या कामगिरीबद्दल आजपावेतो त्यांना एकुण रोख रु 9,70,000/- बक्षिस म्हणून मिळालेले आहेत व 170 हून अधिक प्रशंसापत्र मिळालेले आहेत. या त्यांच्या गुणवत्तापूर्ण कामगिरीबद्दल त्यांना आजच्या स्वातंत्रदिनाचे औचित्य साधून त्यांना राष्ट्रपती पोलीस पदक जाहिर झालेले आहे.